घेण्या
ये क्रमांक
ाजार

शात सीओपीडी
आहे. हा आजार
त्यामुळे योग्य
गावत असतात.
न करणारा असेल
क वेळ लागतो.
घेण्या आजारामध्ये
होणार असल्याचे
वरिष्ठ सल्लागार
ी सांगितले. ■

ा आजाराने ग्रासले
ा महिलांचे आहे.
ामधील हवा आत
ातनलिका अरुंद
प्फुसात जाणाऱ्या
त कमी होते.
ामुळे रुग्णाच्या
ून, छातीत गच्च
वाढतो. यामुळे
ास प्रारंभ होत
व घाबरण्यासारखे
होत असल्याचे
यांनी सांगितले.
र चौधरी, डॉ.
तम मोहरील, डॉ.
त होते. ■

राज्य संस्कृत शास्त्र स्पर्धेत कालिदास विद्यापीठ अव्वल

तभा वृत्तसेवा
नागपूर, १५ नोव्हेंबर

विजेत्यांसोबत कुलगुरू डॉ. उमा वैद्य आणि इतर मान्यवर

नवी दिल्ली स्थित राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या के. जे. सोमया संस्कृत विद्यापीठ केंद्राद्वारे महाराष्ट्र आणि गोवा राज्यस्तरीय शास्त्र स्पर्धेचे आयोजन मुंबई येथे नुकतेच झाले. यात राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये व्याकरण, सांख्ययोग, भाषा, धातुरूपक, पाठ, ज्योतिष, धर्मशास्त्र, भाषा, पुरोहित, साहित्य इ. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील संस्कृत शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध शास्त्रीय ज्ञानाची कठोर परीक्षा घेणाऱ्या या स्पर्धेत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची सात विद्यार्थ्यांची चमू सहभागी झाली होती. या चमूने उत्कृष्ट आठ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला व आपल्या प्रतिभाशाली कामगिरीने सर्व स्पर्धामध्ये पारितोषिके प्राप्त केली.

या विविध स्पर्धांपैकी सांख्ययोग भाषा स्पर्धेत परीक्षित झोडेकर, व्याकरणमध्ये श्रुतिका क्षीरसागर, धर्मशास्त्रात, भाषामध्ये सत्यजित खताळ, पुरोहितमध्ये भूषण मुळे, साहित्यामध्ये वेदश्री आर्वीकर या पाच विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर धातुरूपक पाठ स्पर्धेत श्रीवरदा माळगे, ज्योतिष स्पर्धेत अनुज शर्मा यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. समारोप समारोहामध्ये सोमया विद्यापीठ केंद्राचे प्राचार्य डॉ. सुदेशकुमार शर्मा यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचे रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये विश्व विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सखोल शास्त्रीय ज्ञानाचे प्रदर्शन अतिशय आत्मविश्वासाने केले. त्याचे परीक्षकांनीही कौतुक केले.

प्रथम क्रमांक प्राप्त करणारे सर्व विद्यार्थी अगरतला, त्रिपुरा येथे २८ ते ३१ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रस्पर्धेसाठी जाणार आहेत.

विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य आणि कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी तसेच सर्व विभागप्रमुख यांनी विजयी चमूचे अभिनंदन केले. डॉ. शिवराम भट व डॉ. रेणुका बोकारे यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली ही चमू या स्पर्धांमध्ये सहभागी झाली होती. ■